जॉयस मेयर

गोंधळापासून सुटका कशी करून घ्यावी?

# का देवा का



# का, देवा, का ?

## संभ्रमितता, गोंधळापासून सुटका कशी करून घ्यावी?

# का, देवा, का?

## संभ्रमितता, गोंधळापासून सुटका कशी करून घ्यावी?

# जॉयस मेयर

JOYCE MEYER MINISTRIES®

Plot No: 512/B, Road No-30, Jubilee Hills, Hyderabad-500033

Unless otherwise indicated, all Scripture quotations are taken from The Amplified Bible (AMP). The Amplified Bible, Old Testament copyright © 1965, 1987 by The Zondervan Corporation. The Amplified New Testament, copyright © 1965, 1958, 1987 by
The Lockman Foundation. Used by permission.

Scriptures marked KJV arae taken from the *King James Version* of the Bible.

Copyright © 2011 by Joyce Meyer Ministries - Asia

All rights reserved. No part of this publication may be reproduced, distributed, or transmitted in any form or by any means, or stored in a database or retrieval system, without the prior written permission of Joyce Meyer Ministries - Asia.

Joyce Meyer Ministries - Asia
Nanakramguda,
Hyderabad - 500 008

Phone: +91-40-2300 6777
Website: www.jmmindia.org

Why, God, Why? - Marathi

*How To Be Delivered From Confusion*

*Printed at:*

Caxton Offset Pvt. Ltd.
Hyderabad - 500 004

# अनुक्रमणिका


प्रस्तावना 7

1. संभ्रम कशामुळे निर्माण होतो? 9
2. तर्कवितर्कापासून सुटका 13
3. विश्वासाचा दृष्टीकोन 15
4. एका वेळेला एका दिवसापुरती कृपा मिळते 17
5. जर...तर... 21
6. तर काय? 25
7. स्वत:च्या बुद्धीने चालू नका 29
8. “तर्कवितर्का”मुळे फसवणूक होते 35
9. गोंधळ तुमचा आनंद हिरावून घेतो 41

# प्रस्तावना

योहान.10:10 सांगते की, चोर चोरी आणि घात करण्यास येतो, पण येशू तुम्हांला जीवनाचा आनंद घेता यावा म्हणून आला आहे.

सैतानाला तुमचा आनंद हिरावून घ्यायचा आहे, म्हणून तो तुम्हांला आनंद उपभोगण्यापासून रोखतो. पण जे जीवन आणि शांती तुम्हांला मिळावी म्हणून येशू मरण पावला ते तुम्हांला विपुलपणे मिळावे म्हणून, "देवाला तुमच्या जीवनात प्रभुत्व कसे द्यावे" हे शिकण्यासाठी या पुस्तकाचा तुम्हांला उपयोग व्हावा, अशी माझी प्रार्थना आहे.

# 1

# गोंधळ कशामुळे निर्माण होतो?

तुम्ही गोंधळात पडला आहात का? तुमच्या समजशक्तीपलीकडे असणारी अशी एखादी गोष्ट सध्या तुमच्या जीवनात घडत आहे का? कदाचित तुमचा भूतकाळ तसा असेल, आणि तुमच्या जीवनात जे काही घडले, ते तसे का घडले हे तुम्हांला समजत नसेल. तुम्ही संभ्रमात पडला असाल की, "देवा, हे सर्व माझ्यावरच का यावे? असं होण्याऐवजी तसं का झालं नाही? सर्व काही अखेर असेच का घडले? मला तर काहीच समजत नाही!"

बहुसंख्य लोक प्रचंड गोंधळात पडलेले आहेत, हे माझ्या लक्षात येऊ लागले. माझ्याही जीवनात मी असल्या अनुभवांतून गेले आहे, आणि गोंधळामुळे लोकांना किती भयानक त्रास होतो हे मी चांगलेच अनुभवले आहे. लोक गोंधळात का पडतात, ते गोंधळाला का रोखू शकत नाहीत याविषयी मी विचार करू लागले.

एके रात्री मी कन्सास शहरामध्ये सभा घेत होते. सुमारे 300 लोक

सभेला उपस्थित होते. जीवनातील कोणत्या ना कोणत्या समस्येमुळे त्यांच्यातील कितीजण संभ्रमात पडले आहेत हे विचारण्याची प्रेरणा मला झाली. आश्चर्याची गोष्ट म्हणजे माझे पती आणि दुसरी एक व्यक्ती यांच्याखेरीज बाकी सर्वांनी हात वर केले होते.

म्हणजेच 300 पैकी 298 लोक गोंधळलेले होते. हे तर 99.3 टक्के प्रमाण झाले. निरनिराळ्या गटांमध्ये मी पाहणी करू लागले, तेव्हा जवळजवळ सगळीकडेच ही समस्या भेडसावत असल्याचे मला आढळले. निरनिराल्या टक्केवारीत जरी फरक असला, तरी सगळीकडचे प्रमाण मात्र जास्तच होते.

हा गोंधळ, संभ्रम कशामुळे निर्माण होतो याविषयी मी विचार केला व देवाकडे मार्गदर्शन मागितले, तेव्हा त्याने मला सांगितले की, "*सर्व गोष्टींची उत्तरे स्वत:च शोधण्याचा प्रयत्न करण्याचे त्यांना थांबवायला सांग.*" तेव्हा मी आता पूर्वीसारखी गोंधळून का जात नाही हे माझ्या लक्षात आले. माझ्या जीवनात अजूनही अशा अनेक गोष्टी आहेत की त्या मला समजत नाहीत, पण आता माझ्या दृष्टीकोनात फार मोठा फरक पडला आहे. आता सर्व उपाय स्वत:च शोधण्याच्या समस्येपासून देवाने माझी सुटका केली आहे. देवाने माझी तर्कवितर्कापासून (2 करिंथ.10:5) सुटका केली आहे, त्यामुळे मला न समजणाऱ्या गोष्टींचा अंदाज बांधण्याचा, त्यांची उत्तरे शोधण्याचा निष्फळ प्रयत्न करणे मी आता सोडून दिले आहे.

ऐकायला किंवा वाचायला हे फार सोपे वाटते. पण तर्कवितर्क करून स्वत:च सर्व गोष्टींची उत्तरे शोधण्याच्या प्रयत्नामुळे गोंधळाचा जो भयानक त्रास होतो त्यापासून पूर्णपणे मुक्ती मिळू शकते ही वस्तुस्थिती आहे.

जर तुम्ही शांत राहून थोडा विचार कराल, तर तुमच्या लक्षात येईल की, हे सर्व "मना"मध्ये घडत असते.

मन ही एक अशी युद्धभूमी आहे की, सैतानाविरुद्धचे युद्ध आम्ही तेथे एकतर जिंकतो किंवा हारतो. "*देव अव्यवस्था माजविणारा नाही*" (1 करिंथ.14:33). सैतान गोंधळ, अव्यवस्था माजवतो. देवाच्या वचनाशी सुसंगत नसणारे तर्क आणि कल्पना सैतान आपल्याला सुचवतो. 2 करिंथ.10:4,5 मध्ये आपल्याला सांगण्यात आले आहे की, युद्ध जिंकायचे असेल, तर आपल्यामधून तर्कवितर्क काढून टाकले पाहिजेत.

> "कारण आमच्या युद्धाची शस्त्रे दैहिक नाहीत, तर तटबंदी जमीनदोस्त करण्यास ती देवाच्या दृष्टीने समर्थ आहेत; तर्कवितर्क व देवविषयक ज्ञानाविरुद्ध उंच उभारिलेले असे सर्व काही पाडून टाकून प्रत्येक कल्पना बांधून नेऊन तिला ख्रिस्तापुढे मान वाकविण्यास लावतो."
>
> 2 करिंथ.10:4,5

जर देवाचे वचन आपल्याला तर्कवितर्क करू नका म्हणून सांगते, तर आपण त्याचे पालन केले पाहिजे. आणि जर असे युक्तिवाद आपल्यासमोर आले तर आपण आपले विचार येशूच्या आज्ञापालनाकडे लावले पाहिजेत. हा शास्त्रभाग आपल्याला सांगतो की, आपण युद्धामध्ये आहोत, आणि आपले युद्ध हे प्रामुख्याने मानसिक युद्ध आहे. सैतान आमच्या मनांवर हल्ला करतो.

या वचनानुसार आपण त्याच्या हल्ल्यांना आणि कल्पनांना प्रत्युत्तर देत आहोत. खरी किंवा चांगली नसणारी कल्पनाचित्रे कधी तुम्ही तुमच्या मनाच्या पडद्यावर पाहिली आहेत का? सिद्धान्त हे तुमच्या स्वत:च्या समस्या कशा प्रकारे सोडवाव्यात याची निरनिराळी सूत्रे किंवा योजना आहेत, तर तर्कवितर्क म्हणजे ज्या प्रश्नांची उत्तरे केवळ देवाकडेच आहेत, ती उत्तरे स्वत:च शोधण्याचा प्रयत्न करणे.

थोडक्यात सांगायचे म्हणजे ज्या प्रश्नाचे किंवा समस्येचे उत्तर केवळ देवाकडेच आहे, त्याचे उत्तर स्वत: शोधण्याचा प्रयत्न करणे म्हणजे गोंधळ होय! काही कारणामुळे देव ते उत्तर आपल्याला प्रकट करीत नाही.

# 2

# “तर्कवितर्का”
# पासून सुटका

तर्कवितर्कापासून माझी सुटका झाल्याचे गमक तुम्हांला खऱ्या अर्थाने समजून घेण्यासाठी, माझी मानसिक बैठक पूर्वी कशी होती हे तुम्हांला समजून घ्यावे लागले.

स्वावलंबी राहून स्वत:ची काळजी स्वत:च घेणे ही सर्वोत्कृष्ट आणि सर्वांत सुरक्षित पद्धत आहे, म्हणून कोणावरही अवलंबून राहायचे नाही हे मी लहानपणापासूनच ठरवले होते. दुसऱ्यांची कमीत कमी मदत घेण्यामुळे मी अधिक सुखी राहीन, कारण त्यामुळे दुसऱ्यांच्या उपकाराच्या ओझ्याखाली मी दबणार नाही असे मी ठरवले होते. लोकांकडून सतत दुखावली जायला मी कंटाळले होते, आणि या प्रकारच्या जीवनपद्धतीमुळे दु:खत्रासापासून माझे रक्षण होईल असे मला वाटले.

माझी ही विचारसरणी अर्थातच चूक होती, पण माझ्या हे लक्षात येऊन ते मान्य करायला खूप काळ लागला. हा सर्व काळ मी चिंता करण्यात, तर्क करण्यात, अंदाज करण्यात, आडाखे बांधण्यात, कल्पना करण्यात घालवला, ही यादी अशीच वाढत जाईल, पण या सर्व काळात मी जास्तच

निराश होत गेले. आपण स्वत:वर जितके जास्त अवलंबून राहू, तितका अधिक देवावर किंवा दुसऱ्या कोणावर विश्वास ठेवणे कठीण जाते.

आपण स्वत:वर विसंबून राहण्याऐवजी पूर्णपणे देवावर अवलंबून राहावे अशी देवाची इच्छा आहे. तुम्ही जितके जास्त येशू ख्रिस्तावर अवलंबून राहाल, तितके अधिक तुम्ही तुम्हांला न समजणाऱ्या गोष्टी, समस्या त्याच्यावर सोपवण्यास शिकाल, आणि योग्य वेळी तो त्या तुम्हांला समजावून सांगेल.

या दृष्टीकोनाची निष्क्रियतेशी गल्लत करू नका. जेथे विश्वासाचा संबंध आहे, निदान तेथे तरी आपल्याला निष्क्रिय राहायचे नाही. तुमच्या् किंवा तुमच्या मित्राच्या जीवनात घडलेली एखादी गोष्ट नक्की काय आहे किंवा ती का घडली हे तुम्हांला समजत नसेल, तर तुम्ही प्रार्थना करा. पवित्र आत्म्याने तुम्हांला शिकवावे, मार्गदर्शन करावे आणि प्रगटीकरण करावे म्हणून त्याला विनंती करा, आणि मग देव त्याच्या योग्य वेळी[1] ते तुम्हांला समजावून सांगेल हे लक्षात घेऊन, त्याची वाट पाहा.

तुमच्या मनात प्रश्न उपस्थित होतील तेव्हा थोडा वेळ तुम्ही त्यांवर विचार करू शकता, पण ज्या क्षणी तुम्ही गोंधळात पडू लागता, त्याच क्षणी तुम्ही देवाकडे या प्रश्नांचे उत्तर आहे, म्हणून त्याची उपकारस्तुती करा. त्याच्या योग्य वेळी तो तुम्हांला ते समजावून सांगेल असा तुमचा विश्वास आहे हे त्याला सांगा.

मी सांगितलेला हा दृष्टीकोन जोपर्यंत तुम्ही स्वीकारीत नाही, तोपर्यंत तुमची गोंधळापासून सुटका होणार नाही. हा दृष्टीकोन *विश्वासाचा दृष्टीकोन* आहे.

[1] देवाची योग्य किंवा सुनियोजित वेळ याविषयी जॉयस मायर यांचे ‘‘कधी, देवा, कधी’’ हे पुस्तक उपलब्ध आहे.

# 3

# विश्वासाचा दृष्टीकोन

विश्वासाला आपण सिद्धान्त किंवा देवापासून मिळवण्याचा मार्ग म्हणू शकतो. इफिस. 3:8-9 मध्ये आपण पाहतो की, *कृपेने विश्वासाच्या द्वारे* आपले तारण झाले आहे. इब्री. 11:1 म्हणते, "विश्वास हा आशा धरलेल्या गोष्टींविषयीचा भरवसा आणि न दिसणाऱ्या गोष्टींब-लची खात्री आहे." विश्वासाची व्याख्या किंवा वर्णन आपण अनेक प्रकारे करू शकतो. पण माझ्यामते विश्वासाकडे पाहण्याचा, आपण विश्वासाने कार्य करीत आहोत की नाही हे तपासण्याचा साधासोपा मार्ग म्हणजे "विश्वासाला दृष्टीकोन आहे" असे म्हणणे.

विश्वासाचा दृष्टीकोन आपल्याला विसाव्यात आणतो. इब्री. 4:3 सांगते की, जे देवावर विश्वास ठेवतात ते त्याच्या विसाव्यात प्रवेश करतात. इब्री. 4 मध्ये हेही सांगितले आहे की, ज्यांनी देवाच्या विसाव्यात प्रवेश केला आहे, (विश्वास हे विसाव्याचे प्रवेशद्वार आहे हे लक्षात ठेवा.) त्यांना मानवी कष्ट आणि समस्यांपासूनदेखील विसावा मिळाला आहे (वचन 10). *तर्कवितर्क* हे कष्ट आहेत, आणि ते तुम्हांला विसाव्यात नव्हे, तर गोंधळात, संभ्रमात नेतात.

विश्वासाचा हा दृष्टीकोन म्हणतो की, मी माझ्या चिंता त्याच्यावर टाकीन कारण तो माझी काळजी घेतो. 1 पेत्र 5:7 सांगते की, "*जे काही चालले आहे ते सगळेच मला समजले पाहिजे असे नाही, ज्याला सर्व काही माहीत आहे, त्याला माहीत आहे एवढेच माझ्यासाठी पुरेसे आहे!*" (लेखिकेचे स्पष्टीकरण). तो काय करत आहे हे समजून घेण्याचा प्रयत्न करण्याऐवजी त्याला समजून घेण्यात वेळ घालवा.

विश्वासाचा दृष्टीकोन उद्याविषयी काळजी, चिंता करीत नाही, कारण आपल्याला ठाऊक नसलेल्या उद्यामध्ये येशू अगोदरच आहे. जो होता, आहे आणि जो येणार तोच तो आहे हे लक्षात ठेवा. या जगाचे पाये घातले जाण्यापूर्वी तो अस्तित्वात होता. निर्मितीमध्ये त्याने सहाय्य केले. तुमचा जन्म होण्याअगोदरपासून तो तुम्हांला जाणतो. तुमच्या मातेच्या उदरात त्याने स्वत:च्या हाताने तुमची घडण केली आहे. तो केवळ प्रारंभी होता असे नाही, तर तो प्रारंभ, अल्फा आहे.

शेवटाविषयी काय? गोष्टी सुरू करून तो मध्येच अंग काढून घेतो का? नाही! त्याने जे सुरू केले आहे ते तो शेवटास नेईल. (इब्री.12:2; फिलिप्पै. 1:6). तो अखेरपर्यंत तेथे राहील. तो शेवट, ओमेगा आहे. मला असे म्हणायला आवडते की, "तो फक्त अल्फा आणि ओमेगा, प्रारंभ आणि शेवट आहे असे नाही, तर त्यामधील सर्व काही तोच आहे."

उद्याचा दिवस आपल्यासाठी काहीही आणणार असला, तरी आपला उद्या येशूच्या हाती सुरक्षित आहे हे मला माहीत असल्यामुळे मी निश्चिंत आहे. तो मला आणि उद्याला आपल्या तळहातावर जपतो (यशया 49:16).

विश्वासाचा दृष्टीकोन एका वेळी एक दिवस जगतो.

# 4

# कृपा ही एका वेळी एका दिवसासाठी मिळते

“तर्कवितर्क” हे एकतर आपल्याला भूतकाळात अडकवतात किंवा भविष्यकाळात ढकलतात. “विश्वास हा (आता) आहे” असे इब्री. 11:1 म्हणते हे लक्षात ठेवा. तुम्ही जर भूतकाळात जगण्याचा प्रयत्न केला, तर जीवन कठीण होईल. त्याने स्वत:ला “मी महान होतो” असे म्हटले नाही. तुम्ही जर भविष्यात जगण्याचा प्रयत्न केला, किंवा उद्या काय घडणार हे जाणून घ्यायचा प्रयत्न केला, तर जीवन कठीण होऊन बसेल. त्याने स्वत:ला “मी महान असेन” असे म्हटले नाही. पण जर तुम्ही एका वेळी एका दिवसापुरते जगाल, म्हणजे जो दिवस तुम्ही आता जगत आहात त्या दिवसापुरते जगाल, तर जीवन खूप सुखकर होईल. त्याने म्हटले, “मी आहे” (निर्गम 3:14). विश्वास *आता* आहे.

वादळात त्याने शिष्यांना म्हटले, “तुम्ही का घाबरला? धीर धरा. मी आहे” (मत्तय. 14:27, लेखिकेचे शब्द). तुमच्या लक्षात येते का? येशू म्हणत आहे, ‘मी’ आता या क्षणी तुमच्यासाठी येथे ‘आहे,’ आणि जेव्हा

'मी आहे' तेव्हा सर्व काही सुरळीत होईल. आज जगा! कालची किंवा उद्याची काळजी तुमचा आज चोरून नेते. तुम्हांला आजसाठी कृपा मिळाली आहे. उद्याची कृपा उद्या येईपर्यंत येणार नाही, आणि कालची कृपा सर्व वापरली गेली आहे. कृपा म्हणजे जे काही करायचे आहे, त्यासाठी पवित्र आत्म्याने तुम्हांला सक्षम करणे. पण सांगायचा मु-ा म्हणजे, तुम्ही कृपा घेऊन पुढील काळासाठी साठवून ठेवू शकत नाही.

इस्राएल लोक अरण्यात भटकत होते त्याची तुम्हांला आठवण आहे का? देवाने अलौकिकरित्या त्यांना रोज स्वर्गातून अन्नाचा पुरवठा केला. त्या अन्नाला त्यांनी "मान्ना" म्हटले. आजप्रमाणे उद्यासाठीही आपल्याकडे असावे असे आपल्याप्रमाणेच त्यांनाही वाटले. दुसऱ्या दिवशी सकाळी देव चमत्कार करायला विसरला तर आपले अन्न आपल्याकडे असलेले बरे, असे त्यांना वाटले. पण देवाने त्यांना एका दिवसास पुरेल एवढाच मान्ना गोळा करायला सांगितला. त्यापेक्षा अधिक गोळा करण्याची मनाई केली. तसे केल्यास जास्तीचा मान्ना सडून जात असे. फक्त शब्बाथाच्या आदल्या दिवशी त्यांना दोन दिवसांचा मान्ना गोळा करण्याची परवानगी होती.

थोडा वेळ याचा विचार करा. हे अतिशय सामर्थ्यशाली उदाहरण आपण आजही आपल्या जीवनाला लागू करू शकतो. जेव्हा तुम्ही काळजी, चिंता करता तेव्हा तुम्ही उद्यासाठी मान्ना गोळा करण्याचा प्रयत्न करीत असता का? उद्यासाठी तुम्ही तुमच्या स्वर्गातील पित्यावर भरवसा ठेवावा अशी त्याची इच्छा आहे. नीती.3:5 आपल्याला अगदी मनापासून परमेश्वरावर भाव ठेवण्यास आणि आपल्याच बुद्धीवर अवलंबून न राहण्यास सांगते.

पुढील उदाहरण एकदा माझ्या वाचनात आले. येशू ख्रिस्तावरील विश्वासामुळे दोन माणसांना तुरुंगात टाकले होते. दुसऱ्या दिवशी त्यांना जाळून मारले जाणार होते. त्यांच्यापैकी एकजण वृद्ध होता, देवाच्या मार्गांचा त्याला खूप अनुभव होता. दुसरा तरुण होता, त्याची देवावर खूप प्रीती होती, पण देवाच्या मार्गांविषयीचा त्याला विशेष अनुभव नव्हता.

संध्याकाळ झाल्यावर मेणबत्ती पेटवण्यासाठी तरुणाने काडी पेटवली, तेव्हा त्याचे बोट भाजले. तो खूप अस्वस्थ झाला आणि म्हणू लागला, "जर साधे बोट भाजण्याने एवढ्या वेदना होतात, तर उद्या वधस्थानी जाळले जात असताना माझी काय हालत होईल? ते माझ्या शक्तीबाहेरचे आहे." वृद्ध गृहस्थाने पुढील शब्दांनी त्याचे सांत्वन केले, "मुला, देवाने तुला तुझे बोट भाजून घेण्यास सांगितले नाही, म्हणून त्याने तुला कृपा पुरवली नाही. पण तो तुला तुझ्या जीवनाचे बलिदान करायला सांगत आहे, आणि सकाळ होईल तेव्हा तुला जे करायचे आहे, त्यासाठी तुला कृपा मिळेल याची खात्री बाळग."

वर्षानुवर्षे देवाबरोबर वाटचाल केलेल्या वृद्ध गृहस्थाला माहीत होते की, सकाळी देवाची कृपा निश्चितपणे आपल्याला मिळणार. उद्या क्षमता *(कृपा)* मिळणार म्हणून *आता* तो स्वस्थचित्त होता.

या उदाहरणावरून आपल्या लक्षात येते की, विश्वास "तर्कवितर्का"पासून आपली सुटका करतो. विश्वासाला भविष्याची चिंता करण्याची गरज पडत नाही. उद्याचा मान्ना देव उद्या पुरवील हे त्याला माहीत असल्याने तो निवांत राहतो. माझे तुम्हांला सांगणे आहे की,

भूतकाळात काय घडले किंवा भविष्यात काय घडणार याची चिंता करीत बसून तुमचा आज तुम्ही वाया घालवू नका.

पुढील विधान एकदा माझ्या वाचनात आले: काल हा कॅन्सल झालेल्या चेकसारखा आहे, उद्या हा प्रॉमिसरी नोटसारखा आहे आणि आज हीच तुमच्या हातात असलेली खेळती रक्कम आहे. *तिचा सुज्ञपणे वापर करा!*

# 5

# जर...तर

प्रेषित पौल आपल्याला शिकवतो की, मागील गोष्टींकडे दुर्लक्ष करून पुढील गोष्टींकडे लक्ष लावा (फिलिप्पै. 3:13). आपण भूतकाळात कसे घुटमळतो? आपल्या विचारांनी! आपण मानसिकरित्या भूतकाळात जगण्याचे सोडून देऊन ती शक्ती आजसाठी खर्च करावी.

मागच्या चुकांची तुम्ही सारखी आठवण करता का? "छे, छे, मी असं का केलं? मी *जर* असं बोललो नसतो, किंवा केलं नसतं तर!" किंवा "मी फक्त अमुकतमुक केले असते *तर...!*" इत्यादी विचार तुम्ही कधी करता का? या "*जर...तर*" पासून सावध राहा.

कदाचित तुम्हांला वाटत असेल की, "जे आणि जसे करायला हवे होते ते सर्व तुम्ही केले तरी सर्व बिघडले. असे का घडले असावे? का, देवा, का? मला तर काहीएक समजत नाही. मला हे समजलेच पाहिजे, त्याशिवाय मला स्वस्थता लाभणार नाही. मी पार गोंधळून गेलो आहे."

तुमचे विचार असे आहेत का? मग मी थोडे स्पष्ट बोलू का? "तुम्ही स्वत:लाच त्रास देत आहात!" मीदेखील असे करण्यात वर्षेच्या

वर्षे घालवली. पण त्याने काही उपयोग होत नाही! मला न समजलेल्या अनेक गोष्टी माझ्या पूर्वायुष्यात होत्या, आणि अनेक अजूनही आहेत. पण मागील गोष्टींकडे दुर्लक्ष करून पुढील गोष्टींकडे लक्ष लावण्याचा संदेश देवाने मला दिला म्हणून मी त्याचे आभार मानते. आता मी खूप शांतीचा आनंद घेते.

यशया 26:3 मध्ये देवाचे वचन सांगते, “ज्याचे मन तुझ्या ठायी स्थिर झाले आहे, त्यास तू पूर्ण शांती देतोस, कारण त्याचा भाव तुजवर असतो.” जो तर्कवितर्क करीत आहे, सर्व काही स्वत:च जाणून घेण्याचा प्रयत्न करीत आहे, त्यास तू शांती देतोस असे म्हटलेले नाही.

अनेक अन्यायकारक गोष्टी आपल्याबाबत घडत असतात हे खरे आहे. तुमच्याप्रमाणेच माझ्याही जीवनात अशा गोष्टी घडल्या, त्यामुळे मला अनेक समस्या, त्रास, दु:खे सहन करावी लागली. त्यांवर विजयी होण्यास मला अनेक वर्षे लागली.

मी स्वत:ची कीव करीत असे, आणि जे काही घडले ते का घडले असावे याविषयी कडवट भावनेने विचार, तर्क करीत असे. देवाने मला का मदत केली नाही? दुसऱ्या कोणी मला का मदत केली नाही? असा प्रश्न मला पडत असे.

सरतेशेवटी माझ्या लक्षात आले की, मी स्वत:च माझे जीवन दु:खद करीत आहे. माझे काल समजून घेण्यासाठी मी माझे आज वाया घालवीत

[1] जॉयस यांची कॅसेट मिनिस्ट्री असून,“तुमची दयनीयता सामर्थ्यामध्ये बदला” ही त्यांची कॅसेट उपलब्ध आहे.

होते. एके दिवशी देवाने मला म्हटले, “जॉयस, तू एकतर सामर्थ्यशाली होशील किंवा घृणास्पद, दयनीय होशील. तुला काय व्हायचे आहे?’” [1]

कधीकधी तुम्ही कालच्या विजयांतच जगत असता. ज्या गोष्टीमुळे आपण यशस्वी, विजयी झालो, ती गोष्ट पुन्हा करून यशस्वी व्हावे म्हणून तुमच्या विजयाचे कारण शोधण्यातच तुम्ही वेळ घालवता. माझ्या जुन्या विजयांविषयी विचार करण्यात मला आनंद वाटत असे. असे करण्यामुळेसुद्धा तुमची प्रगती खुंटली जाते. भूतकाळ हा भूतकाळ आहे. भूतकाळात विजय मिळाला असो किंवा पराभव झाला असो, ती भूतकाळातील घटना आहे. ती होऊन गेली आहे. *आज जगा!*

सुखद आठवणींत काही वाईट नाही, पण जुन्या विजयांतच रमणे ही मोठी चूक आहे. तुमच्या जीवनातील प्रत्येक घटनेनंतर, देवाने तुमच्यासाठी नेमलेल्या दुसऱ्या गोष्टीकडे तुम्ही वाटचाल करता तेव्हा मागच्या गोष्टीवर पडदा पडतो. फिलिप्पै. 3:13 म्हणते की, “मागील गोष्टींकडे दुर्लक्ष करून पुढील गोष्टींकडे लक्ष (लावा).”

“जर...तर” विषयी मी तुम्हांला पुन्हा सावध करू इच्छिते. एखादी वाईट गोष्ट घडली, तर “जर असं झालं असतं तर..”असा विचार आपण करतो आणि चांगली गोष्ट घडली, तर अशी गोष्टी “जर पुन्हा घडली तर” किती बरे होईल असा विचार आपण करू लागतो.

*भूतकाळ विसरून जा!* त्याविषयी तर्कवितर्क करीत बसण्याचा प्रयत्न करू नका. आताच निश्चय करा आणि पुढे वाटचाल करा!

# 6

# तर काय?

सैतान तुम्हांला जो दुसरा भीतीदायक बाण (इफिस. 6:16 मध्ये या बाणांना जळते बाण म्हटले आहे.) मारतो तो म्हणजे *तर काय?* हे भीतीदायक वाक्य!

पैसा मिळाले नाहीत *तर काय?* तुम्ही जखमी झालात *तर काय?* तुम्ही जर गंभीर आजारी झाला *तर काय?* तुमची नोकरी सुटली *तर काय?* आयुष्यभर तुम्हांला एकटेच राहावे लागले *तर काय?* किंवा तुम्ही देवापासून ऐकत नसाल *तर काय?* तुम्ही चूक केली *तर काय?* तुम्ही नापास झाला *तर काय?* लोकांनी तुमचा उपहास केला *तर काय?* लोकांनी तुमचा धिक्कार, नाकार केला *तर काय?* ही यादी वाढतच जाऊ शकते. ही विचारप्रणाली तुमच्या परिचयाची आहे का?

हे *तर काय* हे तर्कवितर्क करून सगळ्या गोष्टी जाणून घेण्याचा अजून एक प्रकार आहे. *तर काय* या शब्दासोबत विषण्ण, निराशाजनक चित्र उभे करणारे अनेक विचार येतात. *तर काय* हे आपल्याला भविष्यात घेऊन जाते आणि अजून न घडलेल्या, आणि भीतीपोटी आपण घडवून

आणल्या नाहीत, तर कदाचित कधीही न घडणाऱ्या भयानक गोष्टींनी घाबरवून टाकते.

जर..तर प्रमाणेच तर कायही गोंधळ माजवते. ज्या गोष्टींत आपण गुंगू नये, त्यात आपल्याला गुंगवणारा हा विचारांचा एक प्रकार आहे. 2 करिंथ. 10 मधील "तर्कवितर्क" व "कल्पना" यांमध्ये या दोन्ही प्रकारांचा समावेश आहे.

माझे म्हणणे मी एका व्यावहारिक उदाहरणाद्वारे स्पष्ट करते. आमच्या सेवाकार्यामध्ये एक समय असा आला की, सभा घेण्यासाठी आम्हांला इमारतीची गरज भासू लागली. मागच्या पाच वर्षांपासून आम्ही ज्या इमारतीत सभा घेत होतो ती इमारत पुढच्या दोन वर्षांत पाडली जाऊन तेथे मोठे शॉपिंग सेन्टर बांधले जाणार होते. आमची कार्यालये, साप्ताहिक सभा, नर्सरी, मुलांमधील वाढते सेवाकार्य यांसाठी पुरेशी मोठी जागा आम्ही शोधत होतो. विशेषत: 300 गाड्या पार्क करता येतील अशा जागेच्या आम्ही शोधात होतो.

कदाचित तुम्हांला वाटेल की, ही काही फार कठीण समस्या नाही, पण तुम्हांला वाटते तेवढे ते सोपे नव्हते. आम्ही दोन वर्षे शोध केला. आम्हांला माहीत असलेली प्रत्येक शक्यता आम्ही पडताळून पाहिली. अखेरीस अशी स्थिती आली की, आमच्यासमोरील सर्व मार्ग खुंटले.

सैतानाने आमच्यावर 'दोन वर्षे उलटूनही तुम्हांला जागा मिळाली नाही *तर काय?*' अशासारखे जळते बाण आमच्यावर सोडायला सुरुवात केली. किंवा कधीकधी 'अमुकतमुक प्रॉपर्टी उपलब्ध होती तेव्हाच तुम्ही खरेदी केली असती तर हा प्रश्न तुमच्यासमोर उभा राहिला नसता',

'देवाचे म्हणणे तुमच्या लक्षात आले नाही का?' 'असल्या गोष्टींची तुम्हांला अधिक कल्पना असती, तर काय करायला पाहिजे हे तुम्हांला समजले असते,' 'तुम्ही मालमत्ता खरेदी केल्यावर आवश्यक ती परवानगी, कागदपत्रे तुम्हांला मिळाली नाहीत तर?' 'एखाद्या प्रॉपर्टीसाठी तुम्ही जास्त किंमत दिली, आणि मग त्यापेक्षा चांगली प्रॉपर्टी स्वस्त किंमतीला उपलब्ध होती हे समजले तर?' असाल्या प्रकारच्या बाणांचा वर्षाव आमच्यावर होऊ लागला.

बिल्डींगची ही गरज आमच्यासमोर निर्माण होण्यापूर्वीच देवाने तर्कवितर्कांच्या बंधनातून माझी सुटका केली होती. काही वर्षे अगोदर जर ही समस्या आली असती तर मात्र स्वतःच सर्व समस्या सोडवण्याच्या नादात गोंधळून जाऊन मी माझे जीवन पार दुःखीकष्टी करून टाकले असते.

आमची पावले देव नियंत्रित करतो यावर मी आता विश्वास ठेवू शकते (स्तोत्र. 37:23). आम्ही प्रार्थना करीत आहोत, आणि त्याच्या इच्छेप्रमाणे व्हावे असा भरवसा धरीत आहोत. म्हणून योग्य समयी तो आम्हांला योग्य ठिकाणी नेईल. देव कधीही वेळेपूर्वी कार्य करीत नाही, पण तो विलंबही कधी करीत नाही. पूर्वी आम्ही अनेक प्रयत्न करूनही काही उपयोग झाला नाही. पण योग्य वेळी देवाने चांगली जागा आम्हांला भाड्याने दिली, आणि पावलोपावली तो आम्हांला मार्गदर्शन करीत राहील.

आता मी वेगवेगळ्या परिस्थितीकडे पाहते, आणि त्या यशस्वी का झाल्या नाहीत हे माझ्या लक्षात येते. पण त्या वेळी मात्र मी खूप

नेटाने प्रयत्न करीत होते, पण यश मिळत नव्हते. जर आम्ही देवाच्या वेळेबाहेर काही घडवण्याचा प्रयत्न करू लागलो तर ते कधीच यशस्वी होणार नाही.

आपण काय करीत आहोत हे देवाला पूर्ण ठाऊक आहे. सर्व काही त्याच्या नियंत्रणाखाली आहे. मी काय करणार हे मला माहीत नसले तरी ज्याला सर्व काही माहीत आहे त्याला मी जाणते हे माहीत असल्याने मी निर्धास्त राहते.

तुमच्याविषयी काय? तुम्ही येशूला ओळखता का? तर मग तुम्ही सर्वज्ञानी, सर्वोपस्थित आणि सर्वशक्तीमान देवालादेखील ओळखता.

चिंतामुक्त व्हा! खूप विचार करून एखादी गोष्ट तुमच्या पूर्णपणे आकलनात आली असे तुम्हांला वाटते, आणि देवाने ती गोष्ट निराळ्याच प्रकारे करून तुम्हांला आश्चर्यचकित केले *तर काय?* मग त्यासाठी तुम्ही खर्च केलेला सर्व वेळ वाया जाईल. मग अशा प्रकारे तर्कवितर्क करण्यात आणि गोंधळात तुम्ही आतापर्यंत बराच वेळ वाया घालवला नाही का?

मग या कल्पनेविषयी तुम्हांला काय वाटते?: तुम्ही निर्धास्त, चिंतामुक्त राहून सर्व काही देवाला हाताळू दिले *तर काय?*

# 7

# स्वत:च्या बुद्धीने चालू नका

माझ्यामध्ये मोठ्या प्रमाणात विवेकबुद्धी असावी म्हणून मी प्रार्थना करीत होते. पवित्र आत्म्याने मला म्हटले होते, "जॉयस, तू जोपर्यंत तर्कवितर्क बाजूला ठेवत नाहीस, तोपर्यंत तू विवेकबुद्धीने कार्य करू शकणार नाहीस." तेव्हापासून मी विवेकबुद्धीसाठी प्रार्थना करीत होते.

1 करिंथ. 2 : 14-16 ही वचने आपल्याला स्पष्टपणे सांगतात की, दैहिक मनुष्याला आत्म्याच्या गोष्टी कळत नाहीत. देवाने त्याचा मु-ा मला पटवून देण्यासाठी हे वचन वापरले. जर माझ्या आत्म्याने विवेकबुद्धीने, शहाणपणाने कार्य करण्याचे ठरवले, आणि माझ्या डोक्याने ते योग्य आहे की नाही याविषयी तर्कवितर्क केला, तर मी कधीही प्रगती करू शकणार नाही. का? कारण 1 करिंथ. 2 : 14 सांगते, "स्वाभाविक वृत्तीचा माणूस देवाच्या आत्म्याच्या गोष्टी स्वीकारीत नाही, कारण त्या त्याला मूर्खपणाच्या वाटतात; आणि त्याला त्या समजू शकणार नाहीत कारण त्याची पारख आत्म्याच्या द्वारे होते."

जर तुम्ही देवाचे नव्याने जन्मलेले लेकरू आहात, तर पवित्र आत्मा तुमच्या मानवी आत्म्यात राहतो. आणि मानवी आत्म्याच्या प्रभावाखाली राहिल्याने ज्या गोष्टी करण्याचे तुम्ही टाळत होता त्या तुम्ही कराव्यात म्हणून तुम्हांला प्रवृत्त करण्याचा प्रयत्न करतो.

मी तुम्हांला एक उदाहरण सांगते. एके दिवशी सकाळी मी आमच्या “लाईफ इन द वर्ड”च्या साप्ताहिक सभेसाठी जाण्याची तयारी करीत होते. तेव्हा या सभांना नियमितपणे आणि विश्‍वासूपणे मदत करणाऱ्या एका महिलेविषयी मी विचार करू लागले. या बहिणीला कोणत्या तरी प्रकारे मदत करावी अशी तीव्र इच्छा त्या वेळी माझ्या मनात निर्माण झाली.

मी देवाला म्हटले, “देवा, मी रूथ ॲनसाठी  काय करू?” तीन महिन्यांपूर्वी मी माझ्यासाठी घेतलेला लाल रंगाचा नवीन ड्रेस तिला द्यावा असा जोरदार विचार माझ्या मनात आला. घेतल्यापासून तो ड्रेस माझ्या कपाटात तसाच पडून होता. मला तो खूप आवडत असे. तो घालण्याचा विचार मी बरेचदा करीत असे, पण तो घालण्याची मला कधी इच्छा झाली नाही. त्यामुळे दुकानदाराने जसा पॅक करून दिला होता, तसाच तो माझ्या कपाटात पडून होता. ॲन माझ्यापेक्षा थोडी मोठ्या बांध्याची होती. पण मनोरंजक गोष्ट म्हणजे तो ड्रेस मी माझ्या नेहमीच्या साईजपेक्षा थोड्या मोठ्या आकाराचा घेतला होता. पण त्याची फिटींगच अशी होती की, मी तो घातल्यावर तो मोठा आहे हे कोणाच्याही लक्षात आले नसते.

तो ड्रेस तिला देऊन टाकायची प्रबळ इच्छा माझ्याठायी निर्माण झाली तेव्हा माझ्या डोक्याने म्हटले, “प्रभू, तो ड्रेस तर नवीन आहे.”

माझ्यातील स्वाभाविक मनुष्य माझ्या आत्म्याशी निरर्थक वादविवाद करतो हे लक्षात घ्या. मग मी देवाला म्हटले, “मी नवा कोरा ड्रेस तिला द्यावा असे तू निश्‍चितच म्हणणार नाहीस.” देवाच्या गुणवैशिष्ट्यांचा, उदारतेचा आणि सर्वोत्तमतेचा विचार मी केला असता, तर जुन्यापेक्षा नवीनच ड्रेस त्याने मला द्यायला सांगितला असता हे मला समजले असते.

देवाचे मंदिर बांधण्यासंबंधी दावीद राजा 2 शमुवेल 24:24 मध्ये म्हणतो, “मी आपला देव परमेश्‍वर यास फुकटचे होमबलि अर्पिणार नाही.” ज्या गोष्टी आपल्या दृष्टीने महत्त्वाच्या नसतात, त्या देऊन टाकण्यास आपल्याला काही वाटत नाही. पण नवा कोरा लाल ड्रेस द्यायचा म्हणजे मला त्याग करावा लागला असता.

माझ्या शेवटचा युक्तिवाद तर हास्यास्पद होता. मी म्हटले, “देवा, हे सुंदरसे लाल आणि रुपेरी इअररिंग्ज मी खास या ड्रेससाठी विकत घेतले आहेत.” निदान यामुळे तरी देवाला माझी दया येईल असे मला वाटले. पण देवाचे उत्तर मात्र माझ्या अपेक्षेपेक्षा निराळे होते. “त्या ड्रेसशिवाय हे इअररिंग्ज जर तुला निरुपयोगी असतील, तर तेसुद्धा तिला देऊन टाक.”

देव आमच्याबरोबर वादविवाद करीत नाही. *आमच्या मनात इच्छा निर्माण करून, आत्म्यात तशी जाणीव देऊन, किंवा शांत, मंद आवाजात किंवा कधी वचनाद्वारे देव आमच्याशी बोलतो.* देव आपल्याला त्याच्या वचनाविरुद्ध काहीही करायला सांगणार नाही हे लक्षात ठेवा. तसेच तुम्ही आवाजामुळे बहकले जाणार नाही याची खबरदारी घ्या. अनेक

प्रकारचे आवाज आहेत. तुमचा आत्मा पवित्र आत्म्याच्या साक्षीबरोबर सहमत आहे याची खात्री करून घ्या.

तो ड्रेस रूथ ॲनला द्यावा याविषयी माझा आत्मा सहमत होता, पण माझ्या स्वाभाविक वृत्तीने मात्र याला विरोध केला. म्हणून मी देवाला निरनिराळी निरर्थक कारणे सांगत राहिले. पण देवाने माझ्याशी वाद केला नाही. त्याला जे सांगायचे होते ते त्याने सांगितले होते. याची सुरुवात कशी झाली हे तुम्हांला आठवत असेल. मी रूथ ॲनविषयी विचार करीत होते, ती आमच्यासाठी किती उपयुक्त आहे, आशीर्वादाचे कारण आहे असा विचार करीत होते. तेव्हा मी देवाला विचारले, देवा मी तिच्यासाठी काय करू? काय करावे हे त्याने मला सांगितले, ते योग्य आहे हे माझ्या आत्म्याला माहीत होते, पण माझ्या बुद्धीला मात्र ते पटले नाही. आता निर्णय घेणे माझ्या हाती होते.

मी निर्णय घेणेच लांबणीवर ढकलले. देव जे आपल्याला करायला सांगतो, ते आज्ञाभंग न करता टाळण्याचा हा आपणा सर्वांचा आवडता मार्ग असतो. पण अशी चालढकल करणे हे आज्ञाभंग आहे. चांगले हेतू असणे म्हणजे आज्ञापालन नव्हे. देवाच्या वचनाला अनुरूप अशी कृती करणे म्हणजे आज्ञापालन होय.

यानंतर काही आठवडे उलटले. हा सर्व प्रसंग मी विसरून गेले होते, पण देव विसरला नव्हता. मी रूथ ॲनसाठी प्रार्थना करीत होते. मी देवाला पुन्हा तोच प्रश्न विचारला, “देवा, मी रूथ ॲनसाठी काय करू?” पुन्हा तसेच झाले. तो सुंदर लाल ड्रेस माझ्या डोळ्यांसमोर तरळू लागला. सरतेशेवटी मी म्हटले की, हा ड्रेस न देऊन मी आज्ञाभंग करीत आहे. मी तो देऊन टाकण्याचा निर्णय घेतला.

तो ड्रेस देऊन टाकण्याचा निर्णय घेतल्यावर माझ्या लक्षात आले की, वास्तविक मी तो तिच्यासाठीच घेतला होता, म्हणूनच तीन महिने तो माझ्या कपाटात पडून राहिला. देवाला सर्व गोष्टी अगोदरच माहीत असतात. 1 करिंथ. 2 मध्ये स्वाभाविक किंवा दैहिक मनुष्य आणि आत्मिक मनुष्य यांविषयी जे सांगितले ते समजून न घेतल्यामुळे माझा असा गोंधळ झाला.

"का, देवा, का ?" असे स्वाभाविक माणूस म्हणतो, "मी त्याग करावा अशी तुझी इच्छा का आहे ?" यापेक्षा साधासोपा मार्ग नाही का?" रोम. 8 : 6 म्हणते, "देहस्वभावाचे चिंतन हे मरण; पण आत्म्याचे चिंतन हे जीवन व शांती आहे." देहाच्या विचारांनी आपण शांती गमावून बसतो.

या पुस्तकातील आपला मुख्य उद्देश तुम्ही विसरला असाल, तर मला तुम्हांला आठवण करून देऊ द्या की, "का, देवा, का ?" या प्रकारचा युक्तिवाद आपल्यामध्ये गोंधळ निर्माण करतो, आपली शांती आणि आनंद नाहीसा करतो.

*तुम्हांला तुमच्या जीवनाचा आनंद उपभोगायचा आहे का? मग "तर्कवितर्कां" ना फाटा दिला पाहिजे.*

# 8

# “तर्कवितर्कांमुळे” फसवणूक होते

या दिवसांमध्ये फसवले न जाण्याची एकमेव आशा म्हणजे आत्म्याच्या प्रेरणेने चालणे - देहाने नव्हे तर आत्म्याद्वारे चालवले जाणे. देवाचे वचन आणि आत्मा यांनी चालवले जाण्याऐवजी स्वत:ची इच्छा, भावना आणि बुद्धीने चालणाऱ्या दैहिक ख्रिस्ती लोकांचा सैतान शोध घेत आहे. कृती करू नये असे आपल्याला वाटते, किंवा कृती करू नये असे वाटते म्हणून आपण कृती करू शकत नाही. राज्यासाठी आणि आपल्या स्वत:च्या रक्षणासाठी आपण देवाचा आत्मा सुचवील तशी कृती केली पाहिजे.

अनुत्तरित प्रश्न आपल्याला आवडत नाहीत. आपली दैहिकता वधस्तंभावर खिळण्यासाठी आत्मा जी साधने वापरतो त्यांपैकी एक म्हणजे अनुत्तरित प्रश्न! जेव्हा आपल्याला उत्तर माहीत नसते तेव्हा आपल्याला एकतर देवावर भरवसा ठेवावा लागतो किंवा काळजी करीत स्वत:च खटपट करावी लागते.

येशूने एखाद्या व्यक्तीचे तारण केल्यावर त्या विश्वासणाऱ्याला प्रौढतेप्रत नेणे हे पवित्र आत्म्याचे कार्य आहे. काय चालले आहे ते समजत नसतानाही जो विश्वासणारा पित्यावर भरवसा ठेवतो तो प्रौढ,

प्रगल्भ झालेला विश्वासणारा आहे. म्हणून बरेचदा देव आमच्या प्रश्नांची उत्तरे देत नाही, कारण तो आपल्याला विश्वासाचे प्रशिक्षण देऊ इच्छितो. पण तुम्ही एक गोष्ट लक्षात ठेवावी की, आपले मन देवाच्या या पूर्ण योजनेला विरोध करते. तुमचे मन हे नैसर्गिक, स्वाभाविक आहे आणि जोपर्यंत त्याचे नवीकरण होऊन ते आत्मिकरित्या विचार करायला शिकत नाही तोपर्यंत ते देहाचा भाग समजले जाते.

रोमकरास पत्राचा आठवा अध्याय देहाचे मन आणि आत्म्याचे मन याविषयी बोलते. गलती. 5:17 म्हणते, “कारण देहवासना आत्म्यविरुद्ध आहे व आत्मा देहवासनेविरुद्ध आहे; ही परस्परविरुद्ध आहेत.”

या प्रकरणाच्या सुरुवातीच्या विचाराकडे आपण पुन्हा वळू. नैसर्गिक मन सर्वकाही कुठेतरी ठेवू पाहते आणि एखाद्या लहान सुंदरशा कप्प्यामध्ये ते ठेवून देते.

आमच्या ऑफिसमध्ये टपालेपट्याची भलीमोठी रांग आहे. प्रत्येक पेटीवर संबंधित कामगाराचे नाव लिहिले आहे. एखाद्या कामगाराला एखादी सूचना किंवा संदेश द्यायचा असतो, तेव्हा तशी नोट मी त्याच्या मेलबॉक्सच्या स्लॉटमध्ये टाकते. एकदा मी एका कामगाराच्या पेटीत कोणते तरी काम करण्याविषयीची सूचना टाकली, पण ते काम झाले नाही. काम का झाले नाही याची चौकशी करताना मला आढळले की, मी चुकीच्या डब्यात चिठी टाकली होती. कधीकधी तर मी कोणाचेही नाव नसणाऱ्या डब्यातसुद्धा घाईगडबडीने चिठी टाकत असे.

आता मी तुम्हांला जो पाठ शिकवीत आहे तो मला शिकवण्यासाठी देवाने त्या पत्रपेट्यांचा उपयोग केला. त्या पत्रपेट्यांप्रमाणेच मी माझ्या

मेंदूच्या चुकीच्या कप्प्यात कधीकधी गोष्टी साठवते. त्यामुळे देवावर विश्वास ठेवणाच्या बाबतीत मला "तर्कवितर्काची" समस्या नेहमी येत असे. मी देवाला नेहमी विचारीत असे, "का, देवा, का?" त्यामुळे माझ्या जीवनात अनेक चिंता होत्या, संभ्रम होता आणि शांती व आनंदाचा अभाव होता.

देवाने मला हेही दाखवले की, एखाद्या समस्येचा किंवा गोष्टीचा पूर्ण अंदाज मला आला असून त्याबाबतीत काय करायचे किंवा काय नाही हे मला माहीत आहे असे वाटून मी स्वत:ची बरेचदा फसवणूक करून घेतली. माझ्या अंदाजानुसार कृती करून किंवा न करून त्या गोष्टीचा पुरता विचका केल्यावर ही गोष्ट माझ्या लक्षात येत असे.

हे सत्य मला स्पष्ट समजून सांगण्यासाठी देवाने नीती. 3:7 या वचनाचा उपयोग केला, "तू आपल्या दृष्टीने स्वत:स शहाणा समजू नको; परमेश्वराचे भय धर आणि दुष्कर्मापासून दूर राहा." मला वाटते त्याच्या निम्मीसुद्धा मी शहाणी नाही हे देवाने मला समजू दिले. मी मानसिक बुद्धिमत्तेविषयी बोलत नाही, आपल्या स्वत:विषयी आपले जे मत असते त्याविषयी मी बोलत आहे.

नीती. 3:5-6 म्हणते,

> "तू आपल्या अगदी मनापासून परमेश्वरावर भाव ठेव, आपल्याच बुद्धीवर अवलंबून राहू नको, तू आपल्या सर्व मार्गांत त्याचा आदर कर, म्हणजे तो तुझा मार्गदर्शक होईल."

जेव्हा देव सर्व काही स्पष्ट करतो, तेव्हा तुमच्यासमोर काही गोंधळ, शंका राहत नाहीत. पण जर तुम्ही तर्कवितर्क करण्याचा प्रयत्न केला, तर तुम्ही चक्रव्यूहात गरगर फिरत राहाल आणि तुम्हांला सत्य कधीच समजणार नाही. 7 वे वचन सांगते, “तू आपल्या दृष्टीने स्वत:स शहाणा समजू नको.”

परिस्थितीला सामोरे जाण्याचे दोन मार्ग येथे सांगितले आहेत: एक बरोबर आहे, आणि दुसरा चूक आहे. एक आत्मिक आहे, तर दुसरा दैहिक आहे. समजा, मला न समजणारा भविष्यसंदेश कोणीतरी मला सांगितला, किंवा ज्याचा अर्थ मला समजू शकत नाही, असे आध्यात्मिक स्वप्न मला पडले. तर मी पित्याकडे जाऊन त्याला म्हणू शकते, “पित्या, हे मला समजत नाही. ते मला समजावे अशी माझी इच्छा आहे, म्हणून तू मला प्रकटीकरण दे. तू मला ते समजावून दे.”

मग, मी मला न समजणारी ही गोष्ट फडताळात ठेवून देते. दुसऱ्या शब्दांत सांगायचे म्हणजे त्याविषयी मी विचार करणे मी सोडून देते. ती गोष्ट मी देवाच्या हाती सोपवून देते. मला ते समजून सांगण्याची योग्य वेळ आली म्हणजे तो मला त्याची आठवण देईल. योहान. 14:26 आपल्याला सांगते की, पवित्र आत्मा आपल्याला आठवण करून देतो. माझ्या स्वत:च्या प्रयत्नांनी मला जे कधीही समजले नसते, ते तो मला प्रकटीकरणाद्वारे स्पष्ट करील.

हीच परिस्थिती मी दुसऱ्याही प्रकारे हाताळू शकते. मला न समजणारा भविष्यसंदेश मला मिळाला, किंवा स्वप्न पडले तर त्याचा अर्थ काय असावा याविषयी मी स्वत: विचार करू लागेन. त्याविषयी मी पुष्कळ

लोकांशी बोलून त्यांचे मत विचारीन. पण त्यांची मते निरनिराळी असल्यामुळे माझा गोंधळ अधिकच वाढेल. मग कसे तरी करून त्याचा अर्थ समजल्यावर मी त्यानुसार कृती करायला सुरुवात करीन. पण प्रामाणिकपणे वस्तुस्थिती सांगायची म्हणजे, माझ्या मनात शांती नसेल. त्या भविष्यसंदेशाचा किंवा स्वप्नाचा अर्थ माझ्या दृष्टीने समजून घेऊन मी त्यानुसार कृती करीत राहिले, *तर शेवटी मी मोठा गोंधळ निर्माण करून ठेवलेला असेल.*

"तर्कवितर्क" गोंधळ निर्माण करतात हे लक्षात घ्या. प्रश्न किंवा समस्यांवर मी विचार करू नये असे मी म्हणत नाही. काही समजते की नाही हे पाहण्यासाठी एखाद्या गोष्टीवर बराच काळ विचार करणे, आणि सर्व गोष्टी समजून घेण्यासाठी खूप प्रयत्न करून अखेरीस स्वत:चा गोंधळ उडवून घेणे या दोन गोष्टींत फरक आहे.

*आपण गोंधळात पडलो आहोत असे तुम्हांला वाटेल तेव्हा ती गोष्ट आपण चुकीच्या पद्धतीने हाताळत आहोत हा धोक्याचा इशारा लक्षात घ्या.*

# 9

# गोंधळ तुमचा आनंद हिरावून घेतो

*गोंधळ हा देवाकडून नसतो* ही बाब मला या प्रकरणामध्ये तुमच्या मनावर बिंबवू द्या. 1 करिंथ. 14:33 म्हणते, “देव अव्यवस्था माजविणारा नाही.” कलस्सै. 3:15 म्हणते, “ख्रिस्ताची शांती तुमच्या अंत:करणात राज्य करो.” म्हणजे आमच्या जीवनात निर्णय घ्यायचा अधिकार ख्रिस्ताच्या शांतीच्या हातात असो.

गोंधळ हा शांतीच्या एकदम विरुद्ध आहे. “गोंधळ” म्हणजे, सगळ्या अशुद्ध, चुकीच्या, वेड्यावाकड्या गोष्टींची भरताड. “शांती” म्हणजे व्यत्यय नसणे, सुव्यवस्था, आंतरिक समाधान, नीरवता. एखाद्या व्यक्तीला शांती नसेल, तर तिला आनंद नसेल. योहान. 10:10 मध्ये येशूने म्हटले, “चोर येतो तो केवळ चोरी, घात व नाश करावयास येतो; मी तर त्यांना जीवनप्राप्ती व्हावी व ती विपुलपणे व्हावी म्हणून आलो आहे.”

देवाचा आणि जीवनाचा आनंद उपभोगायचा असे मी काही वर्षापूर्वी ठरवले. मला फक्त जीवन मिळावे म्हणूनच नव्हे, तर त्या जीवनाचा आनंद मी घ्यावा म्हणून जर येशू माझ्यासाठी मरण पावला, तर तो आनंद घेण्याचा प्रयत्न मी केलाच पाहिजे.

विपुल जीवनाविषयी म्हणजे देवाच्या विसाव्यात प्रवेश करण्याविषयी येशूने काय शिकवले त्याचे वर्णन योहान.15 मध्ये केले आहे. 1-10 वचनांमध्ये तो विपुल जीवनाविषयी बोलतो आणि 11 व्या वचनात तो म्हणतो,

> "माझा आनंद तुम्हांमध्ये असावा व तुमचा आनंद परिपूर्ण व्हावा म्हणून मी तुम्हांस ह्या गोष्टी सांगितल्या आहेत."

आपण जीवनाचा आनंद उपभोगावा अशी त्याची खरेच इच्छा आहे हे यावरून दिसते. पण गोंधळ आपल्याला तो आनंद मिळू देणार नाही.

तुम्ही गोंधळात, दु:खात राहू नये, तर आनंदात राहण्याचा निर्णय घ्यावा असे आवाहन मी तुम्हांला अखेरीस करते. तुम्हांला तर्कवितर्क सोडून द्यावे लागतील. जेव्हा जेव्हा आपण आत्मिक विजय मिळवतो, तेव्हा तेव्हा दैहिक स्वभावाचे काही ना काही आपल्याला सोडून द्यावे लागते. देहाचा स्वभाव "स्वत:च समजून घेण्याचा प्रयत्न करणे" हा आहे. तर आत्म्याचा स्वभाव "देव त्याच्या योग्य वेळी सर्व काही प्रकट करील असा विश्वास धरून त्याच्यावर भरवसा टाकणे" हा आहे.

तुम्ही जर "तर्कवितर्क" सोडून द्याल, तर तुम्ही *शांती आणि आनंदाची* कापणी कराल असा माझा विश्वास आहे.

# नवीन जीवनाचा अनुभव घेणे

येशू ख्रिस्ताला जर तुम्ही तुमचा तारणारा आणि प्रभू होण्याचे आमंत्रण कधी दिले नसेल, तर आता तुम्ही त्याला आमंत्रण द्या. पुढील प्रार्थना जर तुम्ही प्रामाणिकपणे केली, तुम्हांला ख्रिस्तामधील नवीन जीवनाचा अनुभव येईल.

*देवपित्या, येशू ख्रिस्त तुझा पुत्र आहे, तो जगाचा तारक आहे असा मी विश्वास धरतो/धरते. तो माझ्यासाठी वधस्तंभावर मरण पावला, त्याने माझी सर्व पापे स्वत:वर घेतली असा मी विश्वास धरतो/धरते. माझ्या जागी तो नरकात गेला आणि मरणावर व कबरेवर विजयी झाला. तो मरणातून विजयी झाला असून आता तो पित्याच्या उजवीकडे बसला आहे असा मी विश्वास धरतो/धरते. येशू मला तुझी गरज आहे. माझ्या पापांची क्षमा कर, माझे तारण कर, माझ्या अंत:करणात राहायला ये. मला नवीन जन्म हवा आहे.*

आता येशू तुमच्या अंत:करणात राहत आहे असा विश्वास धरा. तुमच्या पापांची क्षमा झाली असून त्याने तुम्हांला नीतिमान केले आहे. आणि तो परत येईल तेव्हा तुम्ही त्याच्याबरोबर स्वर्गात जाल.

देवाच्या वचनाचे शिक्षण देणाऱ्या चांगल्या मंडळीचा शोध घ्या आणि ख्रिस्तामध्ये वाढण्यास सुरुवात करा. देवाच्या वचनाचे ज्ञान झाल्याशिवाय तुमच्या जीवनात काहीही बदलणार नाही.

प्रियांनो,

*योहान. 8:31,32 म्हणते, "तुम्ही माझ्या वचनात राहिला तर खरोखर माझे शिष्य आहा; तुम्हांला सत्य समजेल व सत्य तुम्हांस बंधमुक्त करील."*

*तुम्ही देवाचे वचन मिळवा, ते तुमच्या अंत:करणात खोलवर रुजवा आणि 2 करिंथ. 3:18 नुसार जेव्हा तुम्ही वचनाचा अभ्यास कराल, तेव्हा तुम्ही येशू ख्रिस्ताच्या प्रतिमेप्रमाणे व्हाल, असा बोध मी तुम्हांला करते.*

*प्रेमाने पुरे करणारी*

*जॉयस*

# लेखिकेविषयी

जॉयस मायर 1976 पासून देवाचे वचन शिकवीत असून, 1980 पासून त्या पूर्णवेळ सेवेत आहेत. सेन्ट लुईस येथील लाईफ ख्रिश्चन सेन्टर येथे साहायक पाळक म्हणून काम करीत असताना त्यांनी ''लाईफ इन द वर्ड'' नावाच्या साप्ताहिक सभा सुरू केल्या, त्यांचे को-ऑर्डिनेशन केले आणि त्यांत शिकवले. पाच वर्षांच्या सेवेनंतर देवाने त्यांना ''लाईफ इन द वर्ड'' या सेवाकार्याची स्थापना करण्यास सांगितले.

जॉयस यांचे "लाईफ इन द वर्ड" हे रेडिओ आणि टीव्ही कार्यक्रम युनायटेड स्टेट्समध्ये आणि जगभर ऐकले व पाहिले जातात. त्यांच्या पवित्र शास्त्र शिक्षणाच्या कॅसेट्सदेखील जगभर ऐकल्या जातात. लाईफ इन द वर्ड शिबिरांचे आयोजन करण्यासाठी त्या जगभर प्रवास करीत असतात.

जॉयस यांच्या लग्नाला 33 वर्षे झाली असून, त्यांचे पती लाईफ इन द वर्डमध्ये व्यवस्थापक आहेत. त्यांना चार मुले असून चौघेही विवाहित आहेत आणि आपापल्या पत्नींसह ते डेव्ह आणि जॉयससोबत लाईफ इन द वर्डमध्ये सेवा करतात.  जॉयस आणि डेव्ह हे सेन्ट लुईस, मिसुरी येथे राहतात.

विश्वासणाऱ्यांना वचनात मुळावण्याच्या सेवेसाठी आपल्याला पाचारण झाले आहे असा जॉयसचा विश्वास आहे. त्या म्हणतात,

“बंदिवानांना मुक्त करण्यासाठी येशू ख्रिस्त मरण पावला आणि पुष्कळ ख्रिस्ती लोकांना त्यांच्या रोजच्या जीवनात फार थोडा विजय मिळतो किंवा अजिबात विजय मिळत नाही.” अनेक वर्षांपूर्वी आपलीही तीच स्थिती होती आणि देवाचे वचन जीवनाला लागू करण्याद्वारे विजयी जीवन जगण्याचे स्वातंत्र्य आपल्याला मिळाले हे लक्षात घेऊन त्या इतरांना विजयाचे हे रहस्य सांगतात. जॉयसचा विश्वास आहे की, विजयात वाटचाल करणारा प्रत्येक मनुष्य इतरांना विजयी जीवनात आणतो. जॉयस यांचे जीवन पारदर्शी असून त्यांचे शिक्षण प्रॅक्टिकल असून रोजच्या जीवनात ते लागू करता येते.

जॉयस यांनी त्यांच्या सभांमध्ये भावनिक आरोग्य आणि त्याच्याशी संबधित विषयांवर देशभर संदेश दिले आहेत, हजारो लोकांना त्याचा लाभ झाला आहे.

तडाखेबंद विक्री होणारी 54 प्रेरणादायी पुस्तके त्यांनी लिहिली आहेत. त्यांमध्ये *सिक्रेट्स टू एक्सेप्शनल लिव्हिंग, द जॉय ऑफ बिलिव्हिंग प्रेअर,* आणि *बॅटलफिल्ड ऑफ माइंड* या पुस्तकांचा समावेश आहे. तसेच त्यांच्या 2020 ऑडिओ कॅसेट्स (ध्वनिफिती) आणि 90 व्हिडीओ (ध्वनिचित्रफिती) आहेत.

# तारणाची प्रार्थना

देव तुमच्यावर प्रीती करतो आणि त्याला तुमच्यासोबत वैयक्तिक नातेसंबंध हवे आहेत. तुम्ही जर येशू ख्रिस्ताला आपला वैयक्तिक तारणारा म्हणून स्वीकारले नसेल, तर आताच तुम्ही त्याचा स्वीकार करू शकता. त्याच्यासाठी तुमचे अंतःकरण उघडा आणि ही प्रार्थना म्हणा...

"पित्या, मी तुझ्याविरुद्ध पाप केले आहे याची मला जाणीव आहे. कृपा करून मला क्षमा करा. मला शुद्ध कर. तुझा पुत्र येशू ह्याच्यावर विश्वास ठेवण्याचे वचन मी देतो. तो माझ्यासाठी मरण पावला - तो वधस्तंभावर मरण पावला तेव्हा त्याने माझे पाप स्वतःवर घेतले असा माझा विश्वास आहे. तो मेलेल्यांतून उठला असा माझा विश्वास आहे. आता ह्या क्षणी मी माझे जीवन येशूला समर्पण करतो.

पित्या, पापक्षमेची आणि सार्वकालिक जीवनाची देणगी तू मला दिलीस म्हणून मी तुझा/तुझी आभारी आहे. तुझ्यासाठी जगण्यासाठी कृपा करून मला मदत कर. येशूच्या नावात, आमेन."

तुम्ही मनापासून ही प्रार्थना केली म्हणून देवाने तुमचा स्वीकार केला आहे, तुम्हांला शुद्ध केले आहे, आणि आध्यात्मिक मरणाच्या बंधनातून तुम्हांला मुक्त केले आहे. पुढील शास्त्रभाग वाचून त्यावर मनन करण्यासाठी वेळ काढा आणि तुमच्या नवीन जीवनात तुम्ही देवाबरोबर वाटचाल करत असताना त्याने तुमच्याशी बोलावे म्हणून त्याला विनंती करा.

- योहान. 3:16
- 1 करिंथ. 15:3-4
- इफिस. 1:4
- इफिस. 2:8-9

- 1 योहान. 1:9
- 1 योहान. 4:14-15
- 1 योहान. 5:1
- 1 योहान. 5:12-13

ख्रिस्तासोबतच्या नातेसंबंधात तुमची वाढ होण्यासाठी तुम्हांला उत्तेजन मिळावे म्हणून पवित्र शास्त्रावर विश्वास ठेवणाऱ्या चांगली मंडळी (चर्च) तुम्हांला मिळावी म्हणून प्रार्थना करा. देव नेहमी तुमच्यासोबत असेल. तो रोज तुम्हांला मार्गदर्शन करील आणि तुमच्यासाठी त्याच्याकडे असलेले विपुल जीवन कसे जगावे हे तो तुम्हांला दाखवील!